क्र. १३१ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

२६ फेब्रुवारी २०२३

## प्रायश्चित्तकाळातील पहिला रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात सैतान ख्रिस्ताला मोहात पाडण्यासाठी अनेक प्रकारचे डाव रचतो. अनेक प्रलोभने दाखवतो. परंतु ख्रिस्त त्याला बळी पडत नाही, तर मोहावर विजय मिळवितो. आपल्या जीवनातही अनेक प्रकारचे मोह प्रत्येक क्षणाला येत असतात. सत्ता, पैसा व प्रतिष्ठा, मान-सन्मान ह्यासारखे अनेक प्रकारचे मोह मानवी जीवनात अटळ आहेत. प्रत्येक पावलागणिक सैतान माणसाचा पाठलाग करीत असतो. त्यामुळे अनेक चुका, अपराध व पापं आपल्या हातून घडत असतात. पाप, अंधकार जीवनात आपण खितपत राहतो. ह्या सैतानी वृत्तीवर मात करण्यासाठी आपण परमेश्वराशी नाते जोडले पाहिजे. ह्या चाळीस दिवसांच्या उपवासकाळात पुन्हा एकदा आपल्याला परमेश्वराकडे येण्याची संधी मिळत आहे. ख्रिस्ताच्या तारणकार्याद्वारे आपले जीवन पुन्हा एकदा नव्याने उजळविण्यासाठी आपण ह्या उपवासकाळात शुध्द अंत:करणाने मिस्साबलीत सहभागी होऊन प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वर बापा, तुझ्या पुत्राचे मरण व पुनरुत्थान याचा अर्थ आम्हाला समजावा व तो आमच्या जीवनात प्रतिबिंबीत व्हावा म्हणून हा प्रायश्चित्तकाळ आम्हाला साहाय्य ठरो. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### प्रभूशब्द विधी पहिले वाचन

**उत्पत्ती या पुस्तकातून घेतलेले वाचन**

२:७-९, ३:१-७

**''आमच्या पहिल्या आई वडिलांची उत्पत्ती आणि पाप.''**

परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुड्यात प्राणवायू फुंकला, तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. परमेश्वर देवाने पूर्वेस एदेनात बाग लावली आणि त्यामध्ये आपण घडवलेला मनुष्य ठेवला. परमेश्वर देवाने दिसण्यात सुंदर व स्वादिष्ट फळे देणारी अशी सर्व जातीची झाडे, बागेच्या मध्यभागी जीवनवृक्ष आणि बऱ्यावाईटाचे ज्ञान करून देणारा वृक्ष ही जमिनीतून उगवली.

परमेश्वर देवाने उत्पन्न केलेल्या सर्व वनचरात सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, ''तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांस सांगितले हे खरे काय?'' स्त्रीने सर्पास म्हटले, ''बागेतल्या झाडाचे फळ खाण्याची आम्हांला मोकळीक आहे, पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की, ते खाऊ नका. त्याला स्पर्शही करू नका. कराल तर मराल.'' सर्प स्त्रीला म्हणाला, ''तुम्ही खरोखर मरणार नाही, देवाला हे ठाऊक आहे की, तुम्ही त्या झाडाचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील आणि तुम्हास बरेवाईट कळू लागून तुम्ही देवासमान व्हाल.'' त्या झाडाचे फळ खाण्यास चांगले, दिसण्यात मनोहर आणि शहाणपणाच्या प्राप्तीस इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले. तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले व आपणाबरोबर आपल्या पतीलाही दिले. त्याने ते खाल्ले. तेव्हा त्या उभयतांचे डोळे उघडले आणि आपण नग्न आहोत असे त्यांस कळून आले. तेव्हा त्यांनी अंजिराची पाने शिवून आपणासाठी कटिवेष्टने केली.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**५०: ३-६, १२-१४,१७**

प्रतिसाद : **हे प्रभो, आम्हावर दया कर, कारण आम्ही पाप केले आहे**

१. हे देवा, तू आपल्या वात्सल्यास अनुसरून माझ्यावर दया कर. तू आपल्या विपुल करुणेस अनुसरून माझे अपराध पुसून टाक. मला धुऊन माझा दोष अगदी काढून टाक, माझे पाप दूर करून मला स्वच्छ कर.

२. कारण मी माझे अपराध जाणून आहे. माझे पाप माझ्यापुढे नित्य आहे. तुझ्याविरुध्द तुझ्याविरुध्दच मी पाप केले आहे. तुझ्या दृष्टीने जे वाईट ते मी केले आहे.

३. हे देवा, माझ्या ठायी शुध्द हृदय उत्पन्न कर. माझ्या ठायी स्थिर असा आत्मा पुन्हा घाल. तू मला आपल्यापुढून घालवून देऊ नकोस आणि आपला पवित्र आत्मा माझ्यामधून घेऊ नकोस.

४. तू केलेल्या उध्दाराचा आनंद मला पुन्हा दे आणि उत्सुकतेच्या आत्म्याने मला सावरून धर. हे प्रभो, माझे ओठ उघड, म्हणजे माझे मुख तुझी कीर्ती वर्णीन. (प्र)

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन** ५:१२-१९

**''पापांच्या संख्येपेक्षा कृपा अधिक होती.''**

*(एका माणसाच्याद्वारे पाप जगात शिरले आणि पापाद्वारे मरण शिरले आणि सर्वांनी पाप केल्यामुळे सर्व माणसांमध्ये अशाप्रकारे मरण पसरले.) नियमशास्त्रापूर्वी पाप जगात होतेच. पण नियमशास्त्र नसले म्हणजे पाप गणण्यात येत नाही. तथापि, आदामापासून मोशेपर्यंत मरणाने राज्य केले. ज्यांनी आदामच्या उल्लंघनाच्या प्रकाराप्रमाणे पाप केले नाही त्यांच्यावरही त्याने राज्य केले. आदाम तर जो येणार होता त्याचे प्रतिरुप आहे.

परंतु अशी अपराधाची तशी कृपादानांची गोष्ट नाही. कारण ह्या एका मनुष्याच्या अपराधाने पुष्कळ माणसे मरण पावली तर देवाची कृपा आणि एक मानव येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेचे दान ही पुष्कळ जणांकरिता विशेष करून विपुल झाली आणि पाप केलेल्या एकाच मनुष्याद्वारे जसा परिणाम झाला तसा कृपादानांचा होत नाही. कारण ज्याचा परिणाम दंडाज्ञा तो त्या एकाच मनुष्यापासून झाला. पण ज्याचा परिणाम नीतिमान ठरणे ते कृपादान पुष्कळ अपराधांपासून झाले.

(जर त्या एकाच इसमाच्याद्वारे त्या एकाच इसमाच्या अपराधाने राज्य चालू झाले तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात ते विशेष करून त्या एकाच येशू ख्रिस्ताद्वारे जीवनात राज्य करतील. तर मग जसे एकाच अपराधामुळे सर्व माणसांना दंडाज्ञा होते तसे नीतिमत्त्वाच्या एकाच निर्णयाने सर्व माणसांना जीवनदायी नीतिमत्त्व प्राप्त होते. जसे त्या एकाच मनुष्यांच्या आज्ञाभंगाने पुष्कळजण पापी ठरले होते तसे ह्या एकाच मनुष्याच्या आज्ञापालनाने पुष्कळजण नीतिमान ठरतील.)

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मत्तय ४:४**

**आलेलुया, आलेलुया**

मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगत असतो.

**आलेलुया**

## शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ४:१-११**

**"येशू चाळीस दिवस उपवास करतो आणि मग त्याला मोह पडतो."**

सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले. तेथे त्याने चाळीस दिवस व चाळीस रात्र उपवास केला. त्यानंतर त्याला भूक लागली, तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, "तू देवाचा पुत्र आहेस तर धोंड्यांच्या भाकरी व्हाव्या अशी आज्ञा कर." परंतु त्याने उत्तर दिले की, "मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल असा शास्त्रलेख आहे." मग सैतानाने त्याला पवित्र नगरीत येऊन मंदिराच्या शिरोभागी उभे केले आणि त्याला म्हटले, "तू देवाचा पुत्र असलास तर खाली उडी टाक, कारण तो आपल्या दूतांना तुझ्याविषयी आज्ञा करील आणि तुझा पाय धोंड्यावर आपटू नये म्हणून ते तुला हातांवर झेलून धरतील." येशूने त्याला म्हटले, असा शास्त्रलेख आहे, परमेश्वर जो तुझा देव त्याची परीक्षा पाहू नको. असाही शास्त्रलेख आहे. पुढे सैतानाने त्याला एका अतिशय उंच डोंगरावर नेऊन जगातील सर्व राज्ये व त्याचे वैभव दाखवले आणि त्याला म्हटले, शास्त्रलेख आहे "तू पाया पडून मला नमन करशील तर मी सगळे काही तुला देईन." तेव्हा येशू त्याला म्हणाला, "अरे सैताना, चालता हो." कारण असा शास्त्रलेख आहे की, परमेश्वर तुझा देव केवळ त्याचीच उपासना कर." मग सैतान त्याला सोडून गेला आणि पाहा देवदूत येऊन त्याची सेवा करू लागले.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आम्हांला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषत: या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे : ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

**आपला प्रतिसाद असेल –** हे परमेश्वरा दया कर आणि तुझ्या लोकांची प्रार्थना ऐक.

१. या प्रायश्चित्तकाळात आम्ही सर्व वाममार्ग सोडून परमेश्वराच्या आज्ञांचे पालन करावे व पापापासून दूर जावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. आपले परमगुरूस्वामी फ्रान्सिस यांना प्रभूने उदंड आयुष्य व आरोग्य बहाल करावे व अखिल ख्रिस्तसभेची धुरा सांभाळण्यास त्यांना मनोबल द्यावे, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. आजच्या तरुण पिढीला जीवघेण्या स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. प्रसंगी तो निराश होत आहे. या तरुण पिढीत देवाने दिलेले जोम कायम टिकून राहावे,म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. आमचे राष्ट्र व शेजारचे राष्ट्र यांच्यात सलोख्याचे, सामंजस्याचे व परस्पर स्नेहाचे संबंध असावेत तसेच तेथे शांतीला कधी तडा जाऊ नये, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या..

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूसाठी, आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## समारोप

हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंत:करणाने ते तुझी सेवा करोत. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या जीवनात तुझ्या दयेची आणि प्रेमाची जाणीव करून दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, हे दान तुला अर्पण करण्यास आम्हास पात्र कर. या दानाच्या समर्पणामुळे आमच्या जीवनात परिवर्तन घडवून आण. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे स्वर्गीय बापा, आमची श्रध्दा व आशा तू वाढवतोस. या ख्रिस्तप्रसादावरील आमचे प्रेम तू दृढ करतोस. तुझ्या शब्दाप्रमाणे वागण्यास व आमच्या जीवनाची भाकर प्रभू ख्रिस्त याचा शोध घेण्यास आम्हांला साहाय्य कर. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## चिंतन

राखेच्या बुधवारपासून ख्रिस्तसभा आध्यात्मिक वसंतऋतू मानला गेलेल्या प्रायश्चित्तकाळात प्रवेश करते. पापी जीवनाला तिलांजली द्यायची व पवित्र जीवनाचा मार्ग चोखाळायचा यासाठी ह्या काळात पोषक वातावरण निर्माण करून दिले जाते. त्यासाठी मोह, पाप, पश्चात्ताप, प्रायश्चित्त, परिवर्तन आणि नवजीवन अशा विविध बाबींवर मार्गदर्शन केले जाते. आजची वाचने (उत्पत्ती २:७-९, ३:१-७; रोम.५:१२-१९; मत्तय ४:१-११) मोह हा विषय हाताळीत असल्याचे दिसून येते. इस्राएली लोक चाळीस वर्षे अरण्यातून प्रवास करीत होते. त्यावेळी त्यांना जे मोह झाले तसेच मोह चाळीस दिवस अरण्यात उपवास करणाऱ्या येशूलाही झाले. सैतानाने घातलेला मोह आणि परमेश्वराने दिलेले आमंत्रण/पाचारण यातील भेद, आदाम, एवा, इस्राएली लोक ह्यांना समजला नाही. येशूने स्पष्टपणे तो ओळखला आणि परमेश्वराच्या शब्दानेच त्याने सैतानाचे मोह परतवून लावले.

**अ) येशूच्या पहिल्या मोहात दोन प्रकारची भूक दडलेली आहे :** सैतानाने येशूच्या शारीरिक भुकेला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. भाकरीपेक्षा प्रभूशब्दाची भूक श्रेष्ठ असते हे येशूने सिध्द केले. प्रायश्चित्तकाळात शारीरिक भुकेपेक्षा आध्यात्मिक भूक भागविण्यासाठी उपवास व बायबल वाचन हे मार्ग अवलंबिले जातात.

**ब) येशूच्या दुसऱ्या मोहात बायबल वाचनाचे दोन अर्थ दडलेले आहेत :** सैतान आपला कार्यभाग साधण्यासाठी बायबलचा आधार घेतो. येशू मात्र परमेश्वराची इच्छा प्रकट करण्यासाठी बायबलचा संदर्भ देतो. बायबल वाचन करायचे ते स्वत:च्या सोयीसाठी नव्हे तर परमेश्वराची इच्छा जाणून घेण्यासाठी.

**क) येशूच्या तिसऱ्या मोहात दोन प्रकारचे स्वामित्त्व दडलेले आहे :** सैतान ह्या जगातील सर्व गोष्टी येशूला देऊ करतो व असा दावा करतो की, ह्या गोष्टींवर त्याची मालकी आहे. येशू मात्र त्याचे स्वामित्त्व झुगारून देतो आणि परमेश्वर पिता हाच जगाचा खरा मालक आहे हे सिध्द करतो.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनातील विविध प्रकारचे मोह मी कशाप्रकारे हाताळतो ?

●●●

| फेब्रुवारी/मार्च २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २७ | सं गॅब्रियल (जां) | : लेवीया ११:१-२,११-१८/मत्तय २५:३१-४६ |
| मंगळ २८ | सं ओसवाल्ड (जां) | : यशया ५५:१०-११/मत्तय ६:७-१५ |
| बध ०१ | सं डेव्हिड (जां) | : योना ३:१-१०/लूक ११:२९-३२ |
| गुरू ०२ | पारागुवेची सं ॲग्नेस (जां) | : एस्तेर १४:१,३-५,१२-१४/मत्तय ७:७-१२ |
| शुक्र ०३ | सं.कुनेगुंडीस (जां) | : यहेज्केल १८:२१-२८/मत्तय ५:२०-२६ |
| शनि ०४ | सं कासिमीर (जां) | : अनुवाद २६:१६-१९/मत्तय ५:४३-४८ |